खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

पुण्य नगरी

वक्तृत्व स्पर्धेत शिवछत्रपती विद्यालयाला सांघिक विजेतपद

राजगुरूनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित ३५व्या हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत वरिष्ठ गटाचा सांघिक विजेतपदाचा राजगुरू करंडक कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालय, पिंपळगाव (निफाड) यांनी, तर कनिष्ठ गटाचा सांघिक विजेतपदाचा करंडक शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर यांनी पटकावला.

राज्यभरातील महाविद्यालयांमधून ७७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. वरिष्ठ गटात मुंबई विद्यापीठाचा अक्षय आळशी याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दयानंद महाविद्यालय, लातूरच्या श्रुती देशमुख यांनी, तर तृतीय क्रमांक पिरंगुट महाविद्यालयाच्या तेजस्विनी शिंदे यांनी मिळविला.

कनिष्ठ गटात वाघेरे महाविद्यालय, ओतूरच्या जयेश पवार याने प्रथम क्रमांक मिळविला. पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयाची प्रणाली कांबळे हिने द्वितीय, तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची तेजस्वी पाचारणे हिने तृतीय क्रमांक पटकावला. रोख पारितोषिकांसह स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील करंडक देण्यात आला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, डॉ. गोपाल अनापुरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. निशा भंडारे, डॉ. दीपक गायकवाड, प्रा. वैशाली सावंत व प्रा. रेखा काळे यांनी काम पाहिले.

Pimpri Chinchwad Edition
Aug 24, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक चषक निफाड, जुन्नरकडे

पुढारी ANCHOR

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत वरिष्ठ गटाचा सांघिक विजेतेपदाचा राजगुरू करंडक कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालय, पिंपळगाव (निफाड) यांनी, तर कनिष्ठ गटाचा सांघिक विजेतेपदाचा करंडक श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर यांनी पटकावला. दोन्ही विजेत्या संघांना प्रत्येकी ५ हजार रुपये रोख व राजगुरू करंडक देऊन गौरविण्यात आले.

हुतात्मा राजगुरू यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत राज्यभरातील महाविद्यालयांमधून ७७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वरिष्ठ गटात मुंबई विद्यापीठाचा अक्षय आळशी याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दयानंद महाविद्यालय, लातूरच्या श्रुती देशमुख यांनी, तर तृतीय क्रमांक पिरंगुट महाविद्यालयाच्या तेजस्विनी शिंदे यांनी मिळविला. विजेत्यांना अनुक्रमे ७५००, ५००० व ३००० रुपये रोख पारितोषिकांसह हुतात्मा राजगुरू चषक देण्यात आला.

कनिष्ठ गटात वाघेरे महाविद्यालय, ओतूरच्या जयेश पवार याने प्रथम क्रमांक मिळविला. पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयाची प्रणाली कांबळे हिने द्वितीय, तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची तेजस्वी पाचारणे हिने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना अनुक्रमे ५०००, ४००० व ३००० रुपये रोख पारितोषिकांसह स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील करंडक देण्यात आला.

वरिष्ठ गटात संकेत वडघुले (तळेगाव), वेदांत होळकर (निफाड) व सिद्धार्थ डोंगरे (राजगुरुनगर), तर कनिष्ठ गटात प्राची पवार (जुन्नर), शर्वरी चव्हाण (पिंपरी) व मंजिरी महामुनी (नारायणगाव) यांना उत्तेजनार्थ प्रत्येकी २५०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, की वक्तृत्व म्हणजे विचारांची अभिव्यक्ती आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःला व्यक्त करण्यासाठी, आवाजाला आत्मविश्वास देण्यासाठी, शब्दांना विचारांची ताकद देण्यासाठी आणि विचारांना समाजहिताची दिशा देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी व्हावे, असे सांगितले.

या वेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, ॲड. बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, डॉ. गोपाल अनापुरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. निशा भंडारे, डॉ. दीपक गायकवाड, प्रा. वैशाली सावंत व प्रा. रेखा काळे यांनी काम पाहिले. उद्योजक जीवन खराबी, अरिहंत ग्रामीण बिगरशेती पतसंस्था व खेड तालुका खरेदी-विक्री संघ यांच्या वतीने स्पर्धेस आर्थिक सहकार्य करण्यात आले. स्पर्धेचे आयोजन डॉ. बाळासाहेब अनुसे व प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, निकाल वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक व प्रा. ज्योती लांडगे, तर सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ व प्रा. नीरज गव्हाने यांनी केले. परिचय डॉ. शेतांबरी मांडे व प्रा. मनीषा साबळे यांनी केला.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांसमवेत मान्यवर.

My Pune Gramin Edition
Aug 25, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

HR

तरुण भारत
Pune Main | 2026-08-24 | Page- 2
epaper.tarunbharat.net

राजगुरुनगरात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

राजगुरूनगर : राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित ३५ व्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत राज्यभरातून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत वरिष्ठ गटाचे सांघिक विजेतेपद पिंपळगाव (निफाड) येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयाने, तर कनिष्ठ गटाचे सांघिक विजेतेपद जुन्नरच्या श्री. शिवछत्रपती महाविद्यालयाने पटकावले. वैयक्तिक प्रकारात वरिष्ठ गटात मुंबई विद्यापीठाचा अक्षय आळशी प्रथम, लातूरची श्रुती देशमुख द्वितीय, तर पिरंगुटची तेजस्विनी शिंदे तृतीय ठरली. कनिष्ठ गटात ओतूरचा जयेश पवार प्रथम, पुण्याची प्रणाली कांबळे द्वितीय, तर राजगुरूनगरची तेजस्वी पाचारणे हिने तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय दोन्ही गटांतील उत्तेजनार्थ विजेत्यांनाही रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, अदी उपस्थित होते.

Powered by Bharati Web

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख